# क्विक हीलचे नवीन उपक्रम

**पुणे** : क्विक हील फाऊंडेशनने (क्यूएचएफ) भावी पिढ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी हातभार लावण्यासाठी तसेच तरुणांना सायबर सुरक्षिततेबद्दल प्रशिक्षित करण्यासाठी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रम सुरू केला आहे. याबाबत क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर म्हणाल्या की, सर्वत्र इंटरनेटचा मोठ्या प्रमाणात वापर होतो आणि तितकेच सायबर गुन्हे देखील वाढले आहेत. आम्ही आशा करतो की, आमचा हा प्रयत्न विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे इंटरनेट पद्धतींचा अवलंब करण्यास आणि समाजात सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणारे सायबर योद्धा बनण्यास प्रेरित करेल.